# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

## भूमि आणि जिंदगी विभाग

### (मॅन्युअल क्रं. ५)

कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचा-यांकडून वापरण्यत येणारे नियम, नियमावली, निर्देश

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम(१)(b)(v)
# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८
# भूमि आणि जिंदगी विभाग

कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचा-यांकडून वापरण्यत येणारे नियम, नियमावली

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार मनपा मालकीच्या मालमत्तांचा विनियोग केला जातो.

व्यापारी संकुले, भाजीमंडया, मच्छीमार्केट, वाहनतळाच्या मोकळ्या जागा इ. वितरणाकामी वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात येतात. आलेल्या निविदांमधून तुलनात्मक तक्ता तयार करुन सर्वात जास्त किंमत देणा-याची निविदा मंजूर करुन त्यास मा. स्थायी समितीची मान्यता घेणेत येते.

मा. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर संबंधित निविदाधारकांकडून भाडे रकमेच्या ६ महिन्या इतकी रक्कम अनामत म्हणून भरून घेतली जाते किंवा लिज वितरणाकामी लिजची संपूर्ण रक्कम भरून घेऊन करारनामा करुन घेऊन मिळकत वितरणाचा आदेश निर्गत केला जातो. त्यानंतर मिळकतीचा ताबा संबंधित निविदाधारकास दिला जातो.